आदिवासी क्षेत्र उपयोजना आदिवासी क्षेत्राबाहेरील
उपयोजना सन २०१३-१४ चे राज्यस्तरीय
योजनानिहाय अर्थसंकल्प तरतूदीचे वाटप
**"आरोग्य सेवा"**

# महाराष्ट्र शासन

आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१३/प्र.क्र.५/का.६
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
तारीख: २३ ऑक्टोबर,२०१३.

**वाचा -**

१) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.बीजीटी २०.१३/प्र.क्र.४३/अर्थ-३, दि.२८.३.२०१३.
२) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अंदाज २०.१३/प्र.क्र.८५/अर्थ-३, दि.२५.४.२०१३.
३) सार्वजनिक आरोग्य विभागाची नस्ती क्र. पीएचडी ३००११/७९/२०१३/आरोग्य-७

**शासन निर्णय -**

आदिवासी उपयोजनांतर्गत "आरोग्य सेवा" या उपशिर्षाखाली २०१३-१४ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात समाविष्ट करण्यात आलेल्या तरतुदीचे व योजनांचे वाटप आणि प्रत्येक योजनांचे अंमलबजावणी अधिकारी सोबत जोडलेल्या विवरणपत्रात दर्शविले आहेत. सदर तरतूद ही आदिवासी उपयोजनेंतर्गत राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान राज्य आरोग्य संस्थांना सहायक अनुदाने या योजनेसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

२. नियंत्रण अधिकारी आणि विभागप्रमुख यांनी ही तरतुद शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र.टिएसपी-१०८६/८७१०/प्र.क्र.३१/का.५ दिनांक ९.३.१९९० अन्वये निश्चित केलेल्या आदिवासी उपयोजना क्षेत्रातील व क्षेत्राबाहेरील मान्य कार्यक्रमांवर/योजनांवर खर्च होतील याची दक्षता घ्यावी. तसेच या तरतूदी खर्च करतांना शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र.टिएसपी-२००३/प्र.क्र.१०१/का-६, दिनांक २६ जुलै, २००४ व टिएसपी-२००५/प्र.क्र.५९/का-६, दिनांक १० नोव्हेंबर, २००५ मधील अटींचे कटाक्षाने पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी तसेच प्रस्तुत शासन निर्णयाद्वारे वितरित करण्यात येत असलेल्या तरतूदी मासिक खर्च विवरणपत्राप्रमाणे खर्च करण्याची दक्षता सर्व नियंत्रक अधिका-यांनी घ्यावी. सदर तरतूदी संगणक वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

३. नियंत्रण अधिकारी व विभाग प्रमुख यांनी आदिवासी उपयोजना क्षेत्रात अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात तसेच आदिवासी उपयोजने क्षेत्राबाहेरील योजनांवर केलेला खर्च स्वतंत्रपणे नोंदविला जाईल याची दक्षता घ्यावी. जेणेकरुन शासनाला आदिवासी क्षेत्रातील व उपयोजने क्षेत्राबाहेरील योजनांवर होणा-या खर्चावर लक्ष ठेवता येईल व तो केंद्रशासनाला कळविता येईल.

४. सर्व नियंत्रण अधिका-यांनी योजनावार मासिक खर्चाची विवरणे आदिवासी क्षेत्र व अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रासाठी व आदिवासी क्षेत्राबाहेरील क्षेत्रासाठी स्वतंत्रपणे विहीत प्रपत्रात ज्या महिन्यात खर्च झाला असेल त्याच्या पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यत या विभागास, नियोजन विभाग, वित्त विभाग व इतर संबंधित प्रशासकीय विभाग व आदिवासी विकास, आयुक्त यांचे कार्यालय, नाशिक यांना पाठवाव्यात.

५ आदिवासी उपयोजनेची तरतूद आदिवासी क्षेत्राबाहेर खर्च झालेली आढळल्यास याबाबत संबंधित विभागातील क्षेत्रिय अधिकारी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक, संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास, संबंधित जिल्हाधिकारी व प्रकल्प अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल. तसेच आदिवासी उपयोजनेंतर्गत उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतून झालेल्या खर्चाचा अहवाल लेखाशिर्षनिहाय/उप लेखाशिर्षनिहाय तसेच साध्य झालेले भौतिक उद्दिष्टनिहाय माहिती जिल्हाधिकारी तसेच प्रकल्प अधिकारी यांनी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक, संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास व आदिवासी विकास विभागास प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत न चुकता पाठवावी.

६. नियंत्रण अधिकारी/विभाग प्रमुख यांनी नियम प्रचलित कार्यपध्दती व सध्याच्या शासकीय धोरणास अनुसरुन चालू योजनांवर खर्च करावा. हे आदेश फक्त अंमलबजावणी /नियंत्रक अधिका-यांच्या अधिनस्त ठेवलेल्या तरतुदीस प्रशासकीय दृष्टया मान्य केलेल्या चालू योजनांवर खर्च करण्यासाठी आहे. याची अंमलबजावणी अधिका-यांनी नोंद घ्यावी.

७. आदिवासी उपयोजनेअंतर्गत आदिवासी क्षेत्र उपयोजना (टिएसपी) व आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना (ओटिएसपी) यांचा खर्च स्वतंत्रपणे नोंदविण्यासाठी लेखाशिर्षामध्ये काही बदल करण्यात आले असल्यास हे बदल लक्षात घेवून खर्च नोंदविताना सुधारित लेखाशिर्ष नोंदविण्याची दक्षता सर्व संबंधितांनी घ्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३१०२३१५०१४६६०२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shashank Ramakant Sawant

Digitally signed by Shashank Ramakant Sawant
DN: CN = Shashank Ramakant Sawant, C = IN, S = Maharashtra, O = Government of Maharashtra, OU = Tribal Department
Date: 2013.10.23 15:51:13 +05'30'

( श. र. सावंत )
**कार्यासन अधिकारी**

प्रत,

१. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.

२. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.

३. महासंचालक, आरोग्य सेवा, मुंबई

४. अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक /नागपूर /ठाणे /अमरावती.

५. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ५ वा माळा, विधानभवन, मुंबई.

६. महालेखापाल (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.

७. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

८. सार्वजनिक आरोग्य विभाग (आरोग्य-७), मंत्रालय, मुंबई

९. कार्यासन अधिकारी (का.क्र. २, ८), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

१०. निवड नस्ती (का.६), आदिवासी विकास विभाग.

**आदिवासी क्षेत्र उपयोजनेखालील सन २०१३-१४ चे अंदाजपत्रकीय तरतूदीचे वाटप**

| शिर्ष : सार्वजनिक आरोग्य<br>योजनेचे नांव : **राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान राज्य आरोग्य संस्थांना सहायेक अनुदान**<br>**(राज्यस्तरीय योजना)**<br>(रु.हजारात) | | **मागणी क्र.टी-५**<br>मुख्य लेखाशिर्ष :२२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य- पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-०३-सार्वजनिक आरोग्य-७९६-जनजाती क्षेत्र उपयोजना (०१) जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना (०१) (१६) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान राज्य आरोग्य संस्थांना सहायक अनुदाने<br>**(२२१० ई-४५५) ३१, सहाय्यक अनुदान (वेतनेतर)** | | |
|---|---|---|---|---|
| जिल्हयाचे नांव | २०१३-१४ साठी केलेली तरतूद | २०१३-१४ ची अर्थसंकल्पीय तरतूद सुपुर्द करण्यात आलेला नियंत्रक अधिकारी | प्रशासकीय विभाग | शेरा |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| **एकूण** | **१००००** | अपर मुख्य सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग | सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय, मुंबई. | |